महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
**शिक्षण शुल्क समिती, मुंबई**
( विनाअनुदानीत व कायमविनाअनुदानीत शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता— शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई—४०० ००१
E-mail :- sssbedmed@gmail.com / jd.hesss-mh@gov.in Tel -022 22694478 Web-www.sssmumbai.org

शिशुस/एकात्मीक पदवी/२०१८/२६८ दि.१०.०७.२०१८

13

प्रति,

सर्व प्राचार्य/विभाग प्रमुख
राज्यातील ४ वर्ष एकात्मीक पदवी (बी.ए.बी.एड/बी.एस्सी. बी.एड.) विनाअनुदानित अभ्यासक्रम महाविद्यालये /केंद्र

विषयः— शिक्षण शुल्क समितीमध्ये ४ वर्ष एकात्मीक पदवी (बी.ए.बी.एड/बी.एस्सी. बी.एड.) अभ्यासक्रमाच्या शुल्क निश्चितीची संकेतस्थळावरील नियमावली व नमुना अर्ज यावर सूचना व हरकती पाठविण्याबाबत.

राज्यातील एन.सी.टी.ई मान्यताप्राप्त चार वर्षीय संकलीत (एकात्मीक) पदवी (बी.ए.बी.एड/बी. एस्सी. बी.एड.) अभ्यासक्रमास महाराष्ट्र शासन राजपत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, अधिसूचना, दि. ०२ मे,२०१८ अन्वये व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित केलेले आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांचा समावेश शिक्षण शुल्क समितीच्या कार्यकक्षेत झालेला आहे. शिक्षण शुल्क निश्चितीकरिता नियम नियमावली व अनुषंगीक बाबी ठरविण्याकरिता डॉ.सुशीलकुमार चौधरी, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई, डॉ. तुकाराम गाढवे, शिक्षण शुल्क समिती, सदस्य तथा सहा.प्राध्यापक, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महा. मुंबई, डॉ. अनिता एम. बेलापूरकर, प्राचार्य, महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटीयन एज्युकेशन सोसायटीचे, एच.जी.एम. आझम शिक्षणशास्त्र महाविद्यालय ,आझम कॅम्पस, कॅम्प, पुणे, डॉ. स्मिता एस. काळे, प्राचार्य, राजगड ज्ञानपीठाचे सौ. निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महा. भोर, पुणे व डॉ. अजयकुमार इंगळे, प्राचार्य, अशोका एज्युकेशन फाउंडेशनचे, अशोका कॉलेज ऑफ एज्युकेशन, अशोका मार्ग, वडाळा, नाशिक ही समिती गठीत करण्यात आली या समितीची बैठक दि.०४.०७.२०१८ रोजी झाली आहे. या बैठकीत एन.सी.टी.ई, व महाराष्ट्र शासन यांच्या सद्यस्थितीतील नियमान्वये ४ वर्ष इंटीग्रेटेड बीएड. अभ्यासक्रमाचे शुल्क निर्धारणासाठी नमुना अर्ज व नियमाली तयार करण्यात आली ती या कार्यालयाच्या संकेतस्थळावर कच्चा मसुदा म्हणून टाकण्यात आलेली आहे. त्यास आपल्या काही सूचना, हरकती व सुधारणा असल्यास या कार्यालयाच्या पत्यावर ईमेलव्दारे दि.२७.०७.२०१८ पर्यंत सादर कराव्यात.

सहसंचालक,
शिक्षण शुल्क समिती,मुंबई